महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२९ /२०२२ दि. २९/१२/२०२२

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत ठाणे शहर पोलीस दलातील **'पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२१'** करीता उमेदवारांची १६०० मीटर धावणे मैदानी चाचणी दि. ०३/०१/२०२३ रोजी पासून बाळकुम पाईपलाईन येथे घेण्यात येणार आहे. सदर रस्ता हा बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे अखत्यारीत येत असून त्या मार्गावरून आजूबाजूचे परिसरातील रहिवासी हे सदर मार्गाचा मॉर्निंग वॉकसाठी, पायी ये–जा करण्यासाठी वापर करीत असतात. सदर मार्ग हा पोलीस भरती मैदानी चाचणीचे अनुषंगाने पादचाऱ्यांकरीता बंद करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत बाळकुम मार्गावरील ग्लोबल हॉस्पिटल समोरील पाईपलाईन मार्गे दादलानी रोडकडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना ग्लोबल हॉस्पिटल समोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने ही साकेत बाळकुम रोड मार्गे बाळकुम सिग्नल, बाळकुम पाडा नं. १, दादलानी रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) दादलानी रोड कडून पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पिटल कडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना मल्टीकार वर्कशॉप, तरबेज इंटरप्रायजेस दादलानी रोड समोरील बृहन्मुंबई महानगरपालिका मार्ग या ठिकाणी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने ही दादलानी रोड, बाळकुम रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. ०३/०१/२०२३ रोजी पासून **'पोलीस भरती प्रक्रिया २०२१'** मैदानी चाचणी संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(डॉ. विनयकुमार राठोड)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे

CamScanner

- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
- नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
- ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि कोपरी, नौपाडा, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.

CamScanner